**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, पुणे- ४११००१**
Web : www.dhepune.gov.in E-mail : budget.dhepune@nic.in
फोन नं.: ०२०/२६१२२११९, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं : ०२०/२६१११११५३

क्रमांक: अर्थसं/२०२३-२४/NPS/लेखा-२,/ ७९७९ दिनांक : १६/०६/२०२३

16 JUN 2023

**अत्यंत महत्वाचे / तात्काळ**

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य.

**विषय - माहे जुन २०२३ च्या वेतनापासुन मासिक अंशदान राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (NPS) मध्ये जमा करणेबाबत. (अशा.अनु.महाविद्यालये व अकृषि विद्यापीठे)**

**संदर्भ :** उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.एनपीएस-२०१९/प्र.क्र.३६६/१९/विशि-१ दि.१७.०३.२०२१.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन निर्णयाचे अवलोकन करण्यात यावे, यानुसार सर्व विभागीय सहसंचालकांना कळविण्यात येते की, अशासकीय अनुदानित महाविद्यालये व अकृषि विद्यापीठातील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना लागु असलेल्या नविन पारिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना (DCPS) चा समावेश राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (NPS) मध्ये करण्यात आलेला आहे.

त्याअनुषंगाने अशासकीय अनुदानित महाविद्यालये व अकृषि विद्यापीठातील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा माहे जुन २०२३ च्या वेतनातून कपात होणारा कर्मचारी हिस्सा (१०%) तसेच जमा व कपात होणारा शासन हिस्सा (१४%) या महिन्यापासून नियमितरित्या **राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (NPS)** मध्ये Protean e-Gov Technologies Ltd. या केंद्रिय अभिलेख देखभाल अभिकरण (CRA), लोअर परेल, मुंबई यांचेकडे जमा करण्यात यावा.

यासाठी सर्व विभागीय सहसंचालक तथा DTO (CRA) यांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व DDO (CRA) कडील १००% कर्मचाऱ्यांचे PRAN Generation करुन घ्यावेत.

उक्तबाबत विलंब होणार नाही याची दक्षता सर्व विभागीय सहसंचालकांनी घ्यावी.

**( डॉ. प्रकाश बच्छाव )**
सहसंचालक, शिक्षण संचालनालय
(उच्च शिक्षण), पुणे-०१.

प्रत - माहिती तथा कार्यवाहीस्तव सविनय सादर.
१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई.
२. मा. प्रकल्प व्यवस्थापक,महाआयटी कॉ.लि.HTE Sevarth, लोअर परेल मुंबई.
३. मा. वरिष्ठ व्यवस्थापक, प्रोटेन ई-गव्हर्नन्स टेक्नालॉजिस लि. लोअर परेल मुंबई.

Scanned with OKEN Scanner